# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 02 April 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०२ एप्रिल २०२५ दुपारी १.०० वा.

****

वक्फ सुधारणा विधेयक २०२५ आज लोकसभेत चर्चा आणि पारीत होण्यासाठी सादर करण्यात आलं. संसदीय कामकाज मंत्री तथा अल्पसंख्याक विकास मंत्री किरेन रिजिजू यांनी हे विधेयक मांडलं. वक्फ विधेयकासंदर्भात स्थापन संयुक्त संसदीय समितीने यावर विस्तृत चर्चा केली, या विधेयकावर देशभरातून सर्वात जास्त जवळपास ९७ लाख सूचना आल्या, समाजातल्या सर्वच स्तरातून शिफारशी प्राप्त झाल्या, २५ राज्य सरकारांनी आपली मतं मांडली, असं रिजिजू यांनी सांगितलं. या विधेयकाबाबत विरोधक दिशाभूल करत असल्याचा आरोप त्यांनी केला. विधेयकातल्या संशोधित तरतुदींची रिजिजू यांनी सविस्तर माहिती दिली.

दरम्यान, विरोधी पक्षाच्या खासदारांनी विधेयक सादर करण्यावर आक्षेप घेतला होता. मात्र सर्व प्रक्रिया पूर्ण करुनच विधेयकात संशोधन आणल्याचं गृहमंत्री अमित शहा यांनी सांगितलं. या विधेयकावर सदनात आठ तास चर्चा होणार आहे.

****

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं देशभरातले एक्सप्रेसवे आणि राष्ट्रीय महामार्गांवरील पथकराच्या दरात आजपासून चार ते पाच टक्क्यांनी वाढ केली आहे. यामुळे महामार्गांच्या दुरुस्ती आणि विस्तारीकरणात मदत होईल असं प्राधिकरणानं म्हटलं आहे. कारसाठी मासिक पासचा दर ९३० रुपयांवरून ९५० रुपये करण्यात आला आहे.

****

समाजात जाती-जातीमध्ये निर्माण झालेला तिढा संपवण्याचं काम सर्वांनी मिळून करायचं आहे, यासाठी पक्षांतल्या कार्यकर्त्यांची निवड काळजीपूर्वक करावी असं आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे आज बीड इथं पक्ष बांधणी आणि संघटन करण्यासाठी युवा संवाद मेळावा घेण्यात आला,

त्यावेळी ते बोलत होते. लोकांच्या अडचणींवर योग्य चर्चा करून त्या सोडवा, सामाजिक माध्यमाचा गैरवापर टाळा, असंही त्यांनी कार्यकर्त्यांना सांगितलं. यावेळी पक्षाचे माजी आमदार, जिल्हाध्यक्ष प्रमुख नेते उपस्थित होते.

****

धुळे तालुक्यातल्या आनंद खेडा गावात एका गोठ्याला मध्यरात्री लागलेल्या भीषण आगीत म्हशीच्या सात पारड्यांचा होरपळून मृत्यू झाला, तर दहा म्हशींना गंभीर दुखापत झाली आहे. गोठ्यामध्ये ठेवलेलं मका, गहू आणि शेती साहित्य जळून खाक झाल्याने पितांबर फकीरा भामरे या शेतकऱ्याचं मोठं नुकसान झालं आहे. जिल्हा परिषद सदस्य तसंच जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी करुन, पंचनामा करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

****

बुलढाणा जिल्ह्यात शेगाव रोडवर तीन वाहनांच्या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला, तर २६ जण जखमी झाले. आज पहाटेच्या सुमारास शेगाव वरून खामगावकडे जाताना एका खाजगी बसला ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात असलेल्या बोलेरो गाडीला समोरून येणाऱ्या महामंडळाच्या बसची धडक बसली, आणि मागून येणारी खाजगी बसही बोलेरोला धडकल्याने हा अपघात झाला. जखमींना खामगावच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पिंप्री राजा ग्रामपंचायतीत आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या उपस्थितीत कन्या दिन साजरा करण्यात आला. मुलीच्या जन्माचं स्वागत करा आणि बाल विवाहाला विरोध करा, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं. याबाबत जनजागृती करण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीनं हा उपक्रम ग्रामपंचायत स्तरावर राबवण्यात येत आहे. यावेळी उपस्थितांना बालविवाह आणि गर्भलिंग निदान चाचणीस विरोध करण्याची शपथ देण्यात आली.

****

आज जागतिक स्वमग्नता दिवस पाळण्यात येत आहे. यानिमित्त छत्रपती संभाजीनगर शहरात क्रांतीचौक इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि आय प्रोग्रेस फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने पथनाट्य सादर करण्यात आलं. यात कर्मचारी आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. आज दिवसभरात शहरातल्या विविध भागात या पथनाट्याचं सादरीकरण होणार आहे.

****

नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी काल मुदखेड तालुक्यातल्या बारड, नागेली आणि डोंगरगाव इथं दौरा करुन ग्रामस्थांशी संवाद साधला. बारड इथं त्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेच्या प्रगतीचा आढावा घेतला, तसंच घरकुल बांधकामाला गती देण्याच्या सूचना केल्या. यावेळी त्यांनी जलजीवन मिशन अंतर्गत मंजूर विहीर तसंच चार लाख २० हजार लिटर क्षमतेच्या जलकुंभाची पाहणी केली.

****

धाराशिव जिल्ह्यात येरमाळा इथं १२ ते १७ एप्रिल दरम्यान होणाऱ्या श्री येडेश्वरी देवी यात्रा नियोजनाची आढावा बैठक काल जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या उपस्थितीत पार पडली. या यात्रेत मोठ्या संख्येने भाविक येणार असल्यामुळे आपत्ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करून यात्रेदरम्यान भाविकांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी आवश्यक त्या मूलभूत सुविधा निर्माण करण्याचे निर्देश पुजार यांनी दिले.

****

बुलडाणा जिल्ह्यातल्या मोठ्या, मध्यम आणि लघु प्रकल्पांमध्ये केवळ ३२ पूर्णांक ६५ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. उन्हाळ्यात पाणीटंचाई निवारणासाठी जिल्हा आणि तालुका प्रशासनाने उपाययोजना सुरु केल्या असून, पाच तालुक्यातल्या १७ गावांमध्ये १९ खाजगी टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे.

****